# नियमीत दिवाणी दावा क्र.०९/२०१७
# CNRNoMHOS120002302017
# गोरख वि. शासन
# <u>नि.क्र. ८२ खालील आदेश</u>
# (आदेश दि.२६/०७/२०२३)

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी निशाणी क्र. ७५ येथे त्यांनी दिलेल्या प्रतिवादी क्र. १० बाबतीत वारस रेकॉर्डवर घेण्याच्या अर्जामध्ये नजरचुकीने टंकलीखीत केलेले आहे त्याचे वारस क्रमांक १ चे नाव विजया श्रीपती भैरट ऐवजी नागर श्रीपती भैरट करण्याबाबत परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले नाही.

३. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ६ नियम १७ जरी दाव्यातील कथने व कैफियतमधील कथने यांनाच लागु पडत असले तरीही प्रस्तुतच्या अर्जाद्वारे मागितलेली वारस अभिलेखावर घेण्याच्या अर्जामधील दुरुस्ती ही केवळ तांत्रीक स्वरुपाची असून ती मंजुर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होत नाही. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर निशाणी क्र. ७५ वरील वारस रेकॉर्डवर घेण्याच्या अर्जाच्या अनुषंगाने काढलेली विजया उत्तम भैरट यांची नोटीस त्यांचे नाव चुकीचे असल्याने न बजावता परत आलेली आहे. त्यामुळे सदरची तांत्रीक स्वरुपाची दुरुस्ती जरी अशा किरकोळ स्वरुपाच्या अर्जांमध्ये करण्याची परवानगी वादीला दिल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होत नाही व याउलट प्रकरण जलद गतीने निपटारा होण्यास मदत होते. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायेचित होणार आहे. सबब, खालील आदेश.

## <u>आदेश</u>

१. नि. क्र. ८२ खालील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मंजूर झालेली दुरुस्ती वादींनी त्वरीत निशाणी क्र. ७५ मध्ये करण्याची

आहे.

३. प्रस्तुत अर्जाचा खर्च वादी ने सोसायचा आहे.

Digitally signed by AMOGH PRABHAKAR KULKARNI
Date: 2023.07.26 11:58:16 +0530

दिनांक – २६/०७/२०२३

(ए. पी. कुलकर्णी )
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
भूम.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. A. P. Kulkarni<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 26/07/2023 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 26/07/2023 |
| Order uploaded on | --- | 26/07/2023 |